# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in वेब-साईट www.mercindia.org.in/www.merc.gov.in


## जाहीर नोटीस

### प्रारुप (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) (पहिली सुधारणा) विनियम,२०१६ वर अभिप्राय मागविण्याबाबत

**जाहिरात क्र. ------- /२०१६**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) (पहिली सुधारणा) विनियम, २०१६" चे प्रारुप तयार केले आहे. या प्रारुपात, बायोमासवर आधारित आणि अ-खनिज इंधनावर आधारित सहनिर्मिती प्रकल्प जेव्हा इंधन वापराच्या अटींचे पालन करीत नाहीत तेव्हा त्यांना देय असलेल्या दराच्या संबंधातील मुख्य विनियमांतील तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

हे प्रारुप विनियम स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह www.merc.gov.in/ www.mercindia.org.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहेत.

आयोग, वरील प्रारुप विनियमांवर लेखी अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित असून त्या ६ (१+५) प्रतींमध्ये, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४००००५ येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६ किंवा mercindia@merc.gov.in या ई-मेल द्वारा पाठवाव्यात.

दि. २६ डिसेंबर, २०१६ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती प्रारुप विनियमांचा अंतिम मसुदा तयार करण्यापूर्वी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

सचिव, मविनिआ

मुंबई,
दिनांक : २ डिसेंबर, २०१६